रविवार दि. १५ मार्च २०१५

टाइम्स

# क्षमतांचा विकास करुन जीवनाला आकार द्या: अभिजीत हेगशेट्ये

## हळबे महाविद्यालयात शुभेच्छा समारंभ

दोडामार्ग , १४ मार्च (वार्ताहर)- , विद्यार्थ्यानि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहीले पाहीजे पदवीनंतर आज नोकरी व्यवसायासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या मिळवण्याचा प्रयत्न करा. आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना ओळखले पाहीजे. स्वत:मधील क्षमता ओळखुन व विविध कौशल्याच्या आधारे तिचा विकास करुन जीवन घडवले तरच आपण यशस्वी व्हाल असे आवाहन नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन व रत्नागिरीचे ज्येष्ठ पत्रकार अभिजीत हेगशेटये यांनी केले. येथील लक्ष्मीबाइ सीताराम हळबे महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी आयोजीलेल्या शुभेच्छा समारंभात प्रमुख अतिथी म्हणुन ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्हि.ए.पाटील हे होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन, सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन व विद्यार्थीनीच्या स्वागतगीताने शुभारंभ करण्यात आला. यावेळी बी.ए.,बी.कॉमच्या परीक्षेत पाच परीक्षेत विशेष गुणवत्तेसह उतीर्णझालेल्या वंदना पटकारे, ईशा बर्वे, स्वप्नगंधा नाईक, पुनम गवस या विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यानी महत्वाकांक्षी बनावे व क्षितीजाला गवसणी घालणारी स्वप्ने पाहावीत असे आवाहन अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांनी केले.

कार्यक्रमाची संपुर्ण जबाबदारी प्रा.एस.एस.पाडगांवकर तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मीना कुडीचिरकर हिने केले. प्रास्ताविक व स्वागत प्रा.सोपान जाधव तर आभार प्रशांत ढेपे यांनी मानले. प्रथम वर्ष कला व वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यानी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.